प्रभात पुणे, सोमवार, दि. ३० एप्रिल २०१८

निवडक



पुणे : हुतात्मा राजगुरू विद्यालयातील उन्हाळी नाट्य शिबिरात सहभागी विद्यार्थीनी.

# राजगुरू विद्यालयात उन्हाळी शिबिराचे आयोजन

पुणे, दि. २९ – पंख आणि क्विकहील फाउंडेशनच्या शाळागण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी एकदिवसीय उन्हाळी नाट्य शिबिर आयोजित करण्यात आले. याप्रसंगी पंख संस्था प्रमुख स्मिता आपटे, फाउंडेशनचे सी. एस. आर प्रमुख अजय शिर्के, अभिनेते श्रीकांत यादव, अभिनेता शुभंकर एकबोटे आणि दिग्दर्शक व अभिनेता बॉबी हे उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. 'नाटक ही स्वतःचा शोध घेण्यासाठी उपयोगी पडणारी आणि समाज एकत्र राहण्यासाठी आवश्यक कला आहे', असे मत श्रीकांत यादव यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी नृत्य व नाटकाचे सादरीकरण केले. राजा दगडे, पायल जाधव, अनघा हरकरे, अनिकेत साठे यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा शेटे व राजगुरू गर्ल्स विद्यालयाच्या पाटील मॅडम यांचे सहकार्य लाभले. या पंख संस्थेच्या स्वयंसेवकांसमवेत या शिबिरासाठी विद्यालयाच्या शिक्षक व शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले.